From the house of
HOME CABLE
HOME NET

मराठी
# होम टाइम्स
साप्ताहिक शनिवार

RNI No.: MAHMAR/2016/66872 | Post Reg. No. MNE/374/2019-21 | Volume IX | Issue 26 | Saturday, 23rd Sept 2023 to 29th Sept 2023 | Price ~~Rs 3/-~~ FREE COPY

www.hometimes.in www.facebook.com/hometimes.in www.twitter.com/hometimes_news hometimes.in write2us@hometimes.in

# आनंद पोटात माझ्या मावेना...
# मुलुंडमध्ये गणेशोत्सवाला आले उधाण

■ होम टाइम्स टीम

गणेश उत्सवाचा आनंद संपूर्ण महाराष्ट्रात पसरला आहे. ठिकठिकाणी गणेश भक्तांकडून मोठ्या भक्ती भावाने गणपतीचे पूजन केले जात आहे. सार्वजनिक आणि घरगुती गणपती उत्सवाने मुलुंड सुद्धा दणाणून गेले आहे. मुख्य रस्त्यांसह गल्लीबोळात हा उत्सव साजरा होत आहे. या उत्सवामध्ये पोलीस प्रशासनाकडून गणेश भक्तांना संरक्षण दिले जात असतानाच त्यांनी देखील गणपती बसवून या उत्सवात सहभाग घेतला आहे. संपूर्ण मुलुंडमधील वातावरण गणपतीमय झाले आहे. सर्वत्र विविध कार्यक्रमांची रेलचेल सुरू आहे. (सविस्तर वृत्त पान २,३,४ व ५ वर)

मुलुंडच्या अंबिका नगर येथील मुलुंडचा महाराजा अंबिका मित्र मंडळाच्या वतीने १७ फुटांच्या श्री गणेशाची प्रतिष्ठापना केली आहे. या मंडळाचे यंदाचे ५२ वे वर्ष आहे. या मंडळाच्या वतीने उत्सव दिवसांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात.







होम टाइम्स मराठी
मध्ये तुमच्या बाप्पाची बातमी होणार प्रसिद्ध

तुमच्या गणपती बाप्पा आणि केलेल्या सजावटीबद्दल दोन ओळींमध्ये माहिती लिहा आणि आम्हाला write2ushometimes.in या लिंक वर पाठवा.

सर्वोत्कृष्ट आणि आकर्षक सजावट करणाऱ्यांचे वृत्त होम टाइम्समध्ये होणार प्रकाशित

# आनंद पोटात माझ्या मावेना...

# मुलुंडमध्ये गणेशोत्सवाला आले उधाण



**मुलुंडचा राजा**

मुलुंड पूर्व, गव्हाणपाडा, यंदाचे ५७ वर्ष,उंची १७.५ फूट, सिंहासनावर आसनास्थ राजाची मूर्ती. विविध सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन.



**ओम ग्रुप मित्र मंडळ**

जे. एन. रोड, यंदाचे २७ वे वर्ष, उंची १० फूट, उत्सव काळामध्ये या मंडळाकडून हजार लाडूंचा भोग चढविला जातो.



**आनंद मित्र मंडळ**

मलबार हिलचा राजा
मुलुंड कॉलनी, मुलुंड पश्चिम,
यंदाचे ३५ वे वर्ष, उंची १५ फूट.



**संतोषी माता मित्र मंडळ (एल.बी.एस.चा राजा)**

एल.बी.एस. मार्ग, मुलुंड पश्चिम,
यंदाचे ३२ वे वर्ष,
उंची २२ फूट



**मुलुंडचा श्री**

जी. व्ही. स्कीम रोड, मुलुंड पूर्व
यंदाचे ५७ वे वर्ष,
उंची १९ फूट



**केशवपाडा मित्र मंडळ**

पी. के. रोड, केशव पाडा
यंदाचे ६९ वे वर्ष,
उंची १६ फूट

# मुलुंडमध्ये गणेशोत्सवाला आले उधाण



**श्री गणेश मित्र मंडळ पटाई बाप्पा**
चंदन बाग लेन, यंदाचे ५९ वे वर्ष, उंची १३ फूट, लाल महाल मधील एका दालनाचा देखावा.



**सरगम मित्र मंडळ**
आर.एच.बी. रोड, यंदाचे ५१ वे वर्ष, उंची १० फूट



**नवयुवक मित्र मंडळ**
कोठारी निवास, मुलुंड पश्चिम, यंदाचे ४० वे वर्ष.



**श्री बाल गोपाळ मित्र मंडळ**
९० फीट रोड, मुलुंड पूर्व, यंदाचे २३ वे वर्ष



**ध्रुव मित्र मंडळ**
विश्वकर्मा नगर, मुलुंड पश्चिम, उंची ७ फूट



**नीलम नगर गणेश उत्सव मंडळ**
नीलम नगर, मुलुंड पूर्व, उंची ५.५ फूट



**सार्वजनिक उत्सव समिती मंडळ**
जे. एन. रोड, मुलुंड पश्चिम, यंदाचे ४० वर्ष, उंची ६.५ फूट



**श्री गिरीजा मित्र मंडळ**
नाहूर गाव, यंदाचे १५ वे वर्ष, उंची ८ फूट



**आझाद मित्र मंडळ**
रामगढ, मुलुंड पश्चिम, यंदाचे ४६ वे वर्ष

# मुलुंडमध्ये गणेशोत्सवाला आले उधाण



**अजिंक्य मित्र मंडळ**
रोहिदास नगर, यंदाचे ४६ वर्ष, उंची १६ फूट, अनेक सामाजिक उपक्रम राबविले आहेत.



**अष्टविनायक मित्र मंडळ**
अशोक नगर, यंदाचे ४७ वर्ष, उंची ५ फूट, वारकरी संप्रदायाची झलक दर्शविली आहे.



**शांतीनगर रहिवाशी संघ**
गौशाळा रोड, यंदाचे २७ वर्ष, मुलुंडचा पहिला पर्यावरणपूरक गणेश उत्सव म्हणून प्रसिद्ध असलेल्या शांती नगर रहीवासी संघाने बेट तयार करून फायबरपासून बनवली आहे. वाढत्या ग्लोबल वॉर्मिंगमुळे निसर्ग सौंदर्याचा ऱ्हास आणि त्यापासून नागरिकांना वाचवण्याचा संदेश आहे.



**नवघर पोलीस ठाणे**
मुलुंड पूर्व, पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी विधीप्रमाणे विघ्नहर्ता पूजन करतात.



**मुलुंड पश्चिम पोलीस ठाणे**
एन. एस. रोड, मुलुंड पश्चिम, संपूर्ण मुलुंड पोलीस ठाण्यात विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.



**शिव प्रेरणा मित्र मंडळ**
(टाटा कॉलनीचा विघ्नहर्ता) मुलुंड पूर्व, यंदाचे ३४ वे वर्ष, उंची ५ फूट, केदारनाथचा देखावा बनवला आहे.



**शिव सह्याद्री मित्र मंडळ**
मुलुंड पाईप लाईन, यंदाचे २२ वे वर्ष, कैलास पर्वताचा देखावा. अनोखी सजावट




**स्वागत मित्र मंडळ (लंबोदर)**
यंदाचे २८ वे वर्ष, उंची १० फूट. गरुडावर आरुढ झालेली बाप्पाची मूर्ती



**विश्वशांती सामाजिक संस्था मित्र मंडळ**
यंदाचे २७ वे वर्ष, उंची १२ फूट.

# मुलुंडमध्ये गणेशोत्सवाला आले उधाण



**महाराष्ट्र मित्र मंडळ**
डंपिंग रोड, मुलुंड पश्चिम, यंदाचे २९ वे वर्ष, उंची १४ फूट



**मुलुंडचा विघ्नहर्ता**
मुलुंड कॉलनी, यंदाचे ५३ वे वर्ष, उंची १८ फूट



**साईनाथ मित्र मंडळ**
साईनाथ नगर, मुलुंड पूर्व, यंदाचे १६ वे वर्ष, उंची १६ फूट



**अचानक मित्र मंडळ**
डंपिंग रोड, मुलुंड पश्चिम, वर्ष ३ रे, उंची ५.५ फूट



**आदर्श तरुण मित्र मंडळ**
सिद्धार्थ नगर, वर्ष ५३ वे, उंची ८ फूट




**श्री केसरी मित्र मंडळ**
मुलुंड पूर्व, उंची १० फूट, पुतना राक्षसी हत्येचा चलचित्र देखावा. पेपरपासून मूर्ती साकारणारे पहिले मंडळ.



**शिवाय मित्र मंडळ**
देवी दयाल रोड, मुलुंड पश्चिम, यंदाचे पहिले वर्ष, कैलास पर्वत साकारल्यानंतर बाप्पा भगवान शिवाच्या त्रिशूळावर डोलताना दिसतात.



**श्री हनुमान सेवा मंडळ**
विजय नगर, मुलुंड पश्चिम, यंदाचे १६ वे वर्ष, शेषनागावर ६.५ फूट उंच गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना केली आहे. सजावट पर्यावरणपूरक पद्धतीने केली आहे.



**सूर्या युथ फाऊंडेशन**
डंपिंग रोड, मुलुंड पश्चिम, यंदाचे पहिले वर्ष, उंची ५ फूट. गणेशभक्तांसाठी मोफत डोळ्यांची तपासणी शिबीराचे आयोजन.

## संपादकीय ▪ हेमांशू कोठारी

# बाप्पा यांना सद्बुद्धी दे रे

सध्या देशभरात गणेश उत्सवाची धूम सुरू आहे. महाराष्ट्र राज्यातील खेड्यापाड्यात तर हा सण मोठ्या उत्साहाने साजरा होत आहे. राज्यभरात जणू गणेश भक्तांची मोठी लाट आलेली पाहायला मिळतेय. १९ सप्टेंबर रोजी सुरू झालेला हा सण. भक्तीमय आणि उत्साहाच्या वातावरणानंतर १० व्या दिवशी म्हणजेच २८ सप्टेंबर रोजी समाप्त होणार आहे. या दहा दिवसाचा कालावधी भक्तांसाठी उत्साह वाढवणारा तर ठरणारच आहे, परंतु गेल्या वर्षभरातील त्यांच्यातील नकारात्मक प्रवृत्तीचे देखील विसर्जन होणार आहे. तसेच तमाम भाविकांसाठी आगामी वर्षभराचा कालावधी उत्साहाचा, भरभराटीचा, सुख समृद्धीचा आणि आरोग्यमय समृद्धी आणणारा जाणार आहे, असा त्यांना आत्मविश्वास आहे. कोरोनाच्या महामारीनंतर पहिल्यांदाच हा उत्सव मोठ्या आनंदाने साजरा झालेला पाहायला मिळतो आहे. घरगुती गणपती बसवणाऱ्या कुटुंबांमध्ये देखील यंदा आनंदी आनंद आहे. दहा दिवसांची यथोचित भक्ती, पूजा करून २८ सप्टेंबर रोजी भाविकांकडून साश्रू नयनांनी त्यांच्या लाडक्या बाप्पाला विसर्जित केले जाणार आहे. पण हे सगळे करत असताना भाविकांनी बऱ्याच गोष्टींचे भान ठेवणे देखील अत्यंत गरजेचे आहे. कारण अनेकदा आनंदाच्या भरात आपणाकडून कळत नकळपणे अनेक चुका घडत असतात. त्यातील महत्वाची चूक म्हणजे गणेशोत्सवाच्या काळात बहुतांश ठिकाणी होणारा वाद्यांचा कर्कश आवाज. अशा कर्कश आवाजाने मोठ्या प्रमाणात ध्वनी प्रदूषण होते. मंडळाकडून तसेच घरगुती गणपती बसविणाऱ्या भाविकांकडून कळत नकळत अशा प्रकारचे ध्वनी प्रदूषण पसरत केले जाते. या प्रदूषणामुळे रुग्णालये, शाळा, महाविद्यालये आणि न्यायालयासारख्या महत्त्वाच्या आस्थापनांना कामे करताना मोठा त्रास होतो. त्याचप्रमाणे काही उत्साही भक्तांकडून मिरवणुकींमध्ये नको ते चाळे करण्याचा प्रयत्न केला जातो. दुसऱ्यांवर गुलालांची उधळण करणे, नशा पान करून नाचणे, पारंपारिक वाद्यांचा वापर न करता मोठा आवाज करणारे वाद्य वाजवणे, मुद्दामहून वाहतूक कोंडी निर्माण होईल अशा पद्धतीने वागणे, नो एन्ट्री मधून गाडी चालवणे यांसारखे वाहतुकीचे नियम मोडणे असे अनेक प्रकार केले जातात. या प्रकारांमुळे वर्षातून एकदा येणाऱ्या भक्तिमय गणेश उत्सवाला गालबोट लागते. त्याचप्रमाणे शासनाकडून पर्यावरण पूरक गणेश उत्सव साजरा करावा असे आवाहन केलेले असतानाही त्यांनाही बहुतांश भाविकांनी या आवाहनाकडे दुर्लक्ष केलेले दिसते. कारण अनेक ठिकाणी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती बसविण्यात आलेल्या आहेत. सजावटीसाठी पर्यावरणाला बाधा पोहोचले असे साहित्य वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे यंदाही या साहित्याचा प्रदूषण वाढीसाठी हातभार लागणार आहे. आता यापुढे तरी ते थांबणे गरजेचे आहे. अशा वागण्याने उपलब्ध असलेले जलस्त्रोत हळूहळू कमी होऊ लागले आहेत. नदी, विहिरी आणि तलावातील पाण्याचे प्रदूषण वाढू लागले आहे. मातीमध्ये विघटन न होणाऱ्या प्लास्टिक सारख्या वस्तूंचा समाविष्ट होऊ लागला आहे. त्यामुळे मातीची सकसता कमी होऊ लागली आहे. त्याचा परिणाम झाडाझुडपांवर होऊ लागलेला दिसतो आहे. हे आणि अशा अनेक प्रकारचा निसर्गाला मारक असलेल्या गोष्टी थांबवायच्या असतील तर आपण आपली जबाबदारी ओळखून वागायला पाहिजे. कारण आता बेजबाबदारपणे वागणे या पृथ्वीला परवडणारे नाही. अर्थात यामुळे मानवाचेच सर्वात जास्त नुकसान होणार आहे. त्यामुळे हे नुकसान टाळायचे असेल आणि ही पृथ्वी पूर्वीसारखीच सुजलाम सुफलाम बनवायची असेल तर मानवाकडून होणारे प्रदुषण थांबणे गरजेचे आहे. त्यामुळे यंदा तरी गणेश विसर्जन करतेवेळी अशा प्रकारचे वागणे टाळायला हवे. आपली संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी जबाबदारीने वागणे आवश्यक आहे. दीड, पाच, सात आणि दहा दिवसांच्या बाप्पांना निरोप देण्यासाठी प्रदूषण होणार नाही अशा प्रकारे वागणे अपेक्षित आहे. कारण सगळ्यांचे विघ्नहरण करणारा हा बाप्पा यावर्षीपासून तरी प्रदूषणाचे हे विघ्नहरण करणारा ठरावा, ही जबाबदारी आपल्या सगळ्यांचीच आहे. त्यासाठी मूर्ती विसर्जनासाठी आलेल्या सगळ्यांनी शिस्तीचे पालन करणे महत्वाचे आहे. विसर्जनाच्या ठिकाणी मिरवणुकीतील जाताना रांगेत आणि रस्त्यात वाहतूक कोंडी होणार नाही अशी पद्धतीने जाणे आणि येणे अपेक्षित आहे. विसर्जासाठी मुर्तीसोबत आणलेले निर्माल्य पाण्यात न टाकता ते निर्माल्य कलशात जमा करावे जेणेकरून हे निर्माल्य खतासाठी वापरले जावे आणि ते झाडांसाठी वापरले जावे. शक्यतो मूर्तींचे विसर्जन पालिकेने तयार केलेल्या कृत्रिम तलावात करावे अथवा विसर्जनासाठी आणलेल्या मुर्त्या पालिका कर्मचारी, संस्थांचे कार्यकर्ते यांच्याकडे द्याव्यात, त्या त्यांना दान कराव्यात जेणेकरून हे लोक त्या मुर्त्यांचे कृत्रिम तलावांमध्ये विसर्जन करू शकतील. मिरवणुकीत नाचताना कसल्याही प्रकारचा बेशिस्तपणा आणू नये. पारंपरिक वाद्यांच्या मधुर आवाजात अथवा टाळ मृदुंगाच्या गजरात मिरवणूक काढली जावी. गणपती बाप्पा मोरया, पुढल्या वर्षी लवकर या असा उद्घोष करत विसर्जनाच्या ठिकाणी शिस्तीमध्ये जावे. कुटुंबियांची काळजी घ्यावी. आरतीसाठी लाऊस्पिकरचा वापर न करता केवळ आपल्या आवाजात आरती म्हणावी आणि आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप द्यावा, पुन्हा पुढच्या वर्षी याच आनंदाने आणि लवकर येण्यासाठी.

# साबुदाण्याच्या रांगोळीतून अवतरली बाप्पाची भव्य प्रतिमा

## गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये दखल झालेली रांगोळी पाहण्याची मुलुंडकरांना मिळाली संधी



▪ **होम टाइम्स टीम**

मुलुंडमध्ये तब्बल ४० किलो साबुदाण्यांपासून श्री गणेशांची रांगोळी साकारण्यात आली आहे. श्री गणेशाची ही रांगोळी मुलुंडमध्ये एक आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. मुलुंडच्या वर्धमान नगर येथील उमया महाल येथील अकराव्या मजल्यावर ही रांगोळी साकारण्यात आली आहे.

मुलुंड मधील सागो गणेशा हा मुलुंड मधील सर्व नागरिकांचा आकर्षणाचा केंद्र आहे. तब्बल ६३ वर्षांची ही गणपतीची रांगोळी साकारण्याची परंपरा भूपेश जोशी, अर्चना पलन, भावना भानुषाली, डॉक्टर

चेतन कोटक या सर्व सहकाऱ्यांसोबत मोहन कुमार दोडेच्या जपत आले आहेत. मोहनकुमार यांनी भव्य रांगोळीची प्रेरणा ज्येष्ठ कलाकार पंडित एस एम पंडित यांच्या प्रेरणेतून घेतली आहे. प्रत्येक वर्षी ते ही कलाकृती गणेश भक्तांसाठी साकारत असतात. अविरतपणे त्यांच्याकडून रांगोळीचे प्रदर्शन सुरू आहे. ही भव्य रांगोळी पाहण्यासाठी दहा हजार भाविक आणि कलाप्रेमी आवर्जून भेट देत असतात. या रांगोळीची दखल याआधी लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड, गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड तसेच विविध रेकॉर्डने देखील घेतलेली आहे. सुमारे ३०० विविध रंगसंगतींच्या माध्यमातून ही साबुदाण्याची रांगोळी साकारण्यात आली आहे. सदर रांगोळी साकारण्यासाठी मोठ्या कौशल्याची गरज असते. एकही रंगसंगती चुकली तर संपूर्ण रांगोळी खराब होऊ शकते. त्यामुळे अतिशय कौशल्यपूर्ण तसेच एकाग्रतेने रांगोळी साकारणे गरजेचे असते. ब्रम्हा आणि श्री गणेशाच्या पौराणिक कथेवर आधारित यावर्षीचा रांगोळी देखावा साकारण्यात आला आहे. सहा बाय सात फुटांची ही श्री गणेशाची रांगोळी आहे. २५ सप्टेंबर पर्यंत ही श्री गणेशाची रांगोळी पूर्ण होणार आहे. ८ ऑक्टोंबर पर्यंत ही रांगोळी सर्व गणेश भाविकांना आणि कलाप्रेमींना प्रदर्शनासाठी उपलब्ध केली जाणार आहे.

# विसर्जन घाटावर बॅनरबाजी करणाऱ्यांवर होणार कारवाई

## पालिका आणि पोलीस प्रशासनाची विसर्जन स्थळांवर करडी नजर

■ **होम टाइम्स टीम**

विसर्जन तलाव क्षेत्रात बॅनरबाजी कराल तर पोलीस कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशाराच प्रशासनाकडून देण्यात आलेला आहे. त्यामुळे बॅनरबाजी करणाऱ्यांमध्ये पालिका प्रशासनाच्या विरोधात नाराजी पसरली आहे. मुलुंड पूर्व आणि पश्चिमेकडे बॅनरबाजांवर पालिका आणि पोलीस प्रशासनाने नजर ठेवली आहे.

गणेश चतुर्थीच्या काळात गणेश विसर्जनासाठी पालिका प्रशासनाने विशेष तयारी केली आहे. ज्यामध्ये कृत्रिम तलाव आणि नैसर्गिक तलाव मिळून सात तलावांमध्ये गणेश विसर्जनाची व्यवस्था करण्यात आली आहे. या विसर्जन तलावा जवळ अनेकदा राजकीय नेत्यांकडून, लोकप्रतिनिधींकडून मोठ्या प्रमाणात बॅनरबाजी करण्यात येते. तसेच अनेक कंपन्यांकडून देखील जाहिरात बाजी करण्यात येतात. परंतु यंदा मात्र पालिका आणि पोलीस प्रशासनाने अशा जाहिरात बाजांवर कारवाई करण्यासाठी कंबर कसली आहे. दीड दिवसांच्या गणपती विसर्जनाच्या आधीच मुलुंड पूर्वेकडील काही विसर्जन तलावाजवळ लावण्यात आलेले बेकायदेशीर बॅनर्स मुलुंड पोलिसांनी उतरविले आहेत. यापुढे जर कोणी अशा सार्वजनिक विसर्जन स्थानावर बॅनरबाजी करेल तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असा इशारा पोलिसांकडून देण्यात आला आहे. विसर्जन स्थानावर अशा प्रकारे बॅनरबाजी केल्यामुळे या स्थळाचे विद्रूपीकरण होतेच परंतु मोठ्या प्रमाणात प्लास्टिकचा कचरा देखील तयार होतो. हे बॅनर्स एकदा या ठिकाणी लावल्यानंतर त्या बॅनरकडे दुर्लक्ष देखील केले जाते. त्यामुळे या परिसरात अस्वच्छता देखील पसरते. प्रशासनाने दिलेल्या नियमावलीनुसार विसर्जन स्थळांवर कुठल्याही जाहिरातींचे बॅनर्स झळकले नाही पाहिजेत असा इशाराच आता देण्यात आलेला आहे. त्यामुळे जाहिरातबाजी करणाऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे.

# वीजबिल थकबाकीचा मेसेज पाठवून मुलुंडवासीयाला पुन्हा गंडवले

## भामट्याने केली आठ लाखांची फसवणूक

■ **होम टाइम्स टीम**

थकीत वीजबिल दाखवून पुन्हा एकदा वीज ग्राहकाला लाखो रुपयांचा गंडा घातल्याचा प्रकार मुलुंडमध्ये घडला आहे. अज्ञात भामट्यांनी मुलुंडमधील वीज ग्राहकाची वीज न भरल्याचा संदेश पाठवून त्याची तब्बल आठ लाख रुपयांची फसवणूक केली. मुलुंड पश्चिममध्ये ही घटना उघडकीस आली आहे.

असे ऑनलाईन गंडा घातल्याचे प्रकार रोखण्यास यंत्रणांना अपयश येत आहे. एकीकडे या प्रकरणाचा अधिक तपास करण्यात मुलुंड पोलीस अपयशी ठरले आहेत, तर दुसरीकडे नागरिकांनाही अशा बनावट लिंकवर क्लिक न करण्याचे आणि आर्थिक व्यवहार करण्यापूर्वी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मुलुंड पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडित व्यक्ती नवघर रोड येथील रहिवासी आहे. १६ सप्टेंबर रोजी पीडित मुलुंड पश्चिम येथील त्यांच्या दुकानात बसले होते. दरम्यान, एका अनोळखी क्रमांकावरून त्यांच्या व्हॉट्सप नंबरवर मेसेज आला. ज्यामध्ये वीज बिल न भरल्याने रात्री ९:३० वाजल्यापासून त्यांचा वीजपुरवठा खंडित करण्यात येईल, असे लिहिले होते. मात्र, त्यांनी संबंधित व्यक्तीला फोन करून वीज बिल भरल्याची माहिती दिली. त्यानंतर, नवीन नंबरवरून कॉल करून, त्यांना सांगण्यात आले की भरलेले वीज बिल अपडेट केले गेले नाही आणि त्यासाठी त्याला पुन्हा वेबसाइटवर जावे लागेल आणि वीज बिल अपडेट करावे लागेल. या वेबसाईटची लिंकही त्यांच्या मोबाईल नंबरवर पाठवली होती. या लिंकवर क्लिक केल्यानंतर, पीडितेने त्याच्या बँक खात्याशी संबंधित माहिती भरताच त्यांच्या बँक खात्यातून ६ वेळा एकूण ८ लाखांहून अधिक रक्कम कापण्यात आली. यानंतर आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानतंर त्यांनी मुलुंड पोलीस ठाण्यात जाऊन अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला. सध्या मुलुंड पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# तिसऱ्या मजल्यावरून पडून मजुराचा मृत्यू

## नवघर पोलिसांकडून ठेकेदारावर गुन्हा दाखल

■ **होम टाइम्स टीम**

मुलुंड पूर्व परिसरात एका इमारतीचे तोड काम करत असताना तिसऱ्या मजल्यावरून पडून कामगाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या घटनेमध्ये कामगाराला आवश्यक असलेले सुरक्षा साहित्य पुरवले गेले नसल्याचा ठपका ठेवत पोलिसांनी कंत्राटदार आणि इमारत व्यवस्थापकाच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

अब्दुल रकीब खान हा नेहमीप्रमाणे मुलुंड येथील ट्रान्सलेट कॅम्प परिसरामध्ये असलेल्या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर बांधकाम तोडण्याचे काम करत होता. १८ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ५:३० च्या दरम्यान काम करत असताना अब्दुलचा तोल गेला. स्लॅब कोसळून तो जमिनीवर आला. त्यात तो गंभीर जखमी झाला. स्थानिकांनी त्याला घाटकोपर येथील राजावाडी रुग्णालयात उपचारासाठी घेऊन गेले, परंतु तोपर्यंत त्याचा मृत्यू झाला होता. याची माहिती अब्दुलच्या भावाला देण्यात आली. त्याच्या भावाने घटनास्थळावरील इतर कामगारांना या संदर्भात विचारणा केली असता अब्दुल खान जेव्हा काम करत होता त्यावेळी त्याला कुठलेही सुरक्षेचे साहित्य ठेकेदाराकडून देण्यात आले नव्हते. त्यामुळे अब्दुल खान यांच्या भावाने नवघर पोलीस ठाण्यात यासंदर्भात ठेकेदाराच्या विरोधात तक्रार दिली असता नवघर पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकाऱ्याने तपास करून ठेकेदाराच्या विरोधात गुन्हा दाखल केला. अब्दुल मुस्ताकी खान आणि बिलाल मोहम्मद या दोघांच्या विरोधात नवघर पोलीस ठाण्यात पुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनेकदा बांधकाम साइट्सवर कामगारांना हेल्मेट तसेच हारनेस लाईफ जॅकेट अशी सुरक्षेची साहित्य न पुरवता त्यांना धोकादायक परिस्थितीत काम करण्यास भाग पाडले जाते. त्यामुळे अनेक कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या घटना या आधी देखील घडल्या आहेत. त्याच पार्श्वभूमीवर मुलुंड पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेला हा गुन्हा इतर बांधकाम कंत्राटदारांसाठी एक धडा असेल अशी आशा करूयात.

# १ ऑक्टोबरपासून महत्त्वाच्या कामांसाठी जन्म प्रमाणपत्र बंधनकारक होणार

## केंद्राने घेतला निर्णय

■ होम टाइम्स टीम

केंद्र आणि राज्य स्तरावर जन्म-मृत्यूची आकडेवारी तयार करण्याच्या उद्देशाने १ ऑक्टोबरपासून सर्व महत्त्वाच्या कामांमध्ये जन्म प्रमाणपत्र अनिवार्य करण्यात आले आहे. केंद्राने दिलेल्या आदेशानंतर येत्या काही दिवसांत जन्म प्रमाणपत्राचे महत्त्व वाढणार आहे.

जन्म आणि मृत्यूची नोंदणी कायदा, २०२३ १ ऑक्टोबर २०२३ पासून देशभरात लागू होणार आहे. त्यामुळे येत्या काळात जन्म दाखल्याचे महत्त्व वाढणार आहे. शाळा-कॉलेजमध्ये प्रवेश, ड्रायव्हिंग लायसन्ससाठी अर्ज, मतदार यादीत नाव जोडणे, आधार नोंदणी, विवाह नोंदणी किंवा सरकारी नोकरी अशा अनेक कामांसाठी एकाच कागदपत्राचा वापर कोणत्याही अडचणीशिवाय करता येणार आहे. केंद्र आणि राज्य स्तरावर नागरिकांच्या जन्म-मृत्यूची आकडेवारी तयार करता येईल, हे विधेयक लागू करण्यामागचे मुख्य कारण असल्याचे सांगितले जात आहे. विधेयक १ ऑगस्ट रोजी लोकसभेत आणि ७ ऑगस्ट २०२३ रोजी राज्यसभेत मंजूर करण्यात आले होते. त्यानंतर आता केंद्र सरकारने याबाबत अधिसूचना जारी करून १ ऑक्टोबरपासून नवीन नियम लागू करण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे.

## नव्या संसदेत नारी शक्तीला वंदन

### महिला आरक्षणाचा तिढा सुटल्याने भाजप महिलांचा जल्लोष



नव्या संसदेमध्ये महिला विधेयक मंजूर झाल्यानंतर मोदी सरकारचे आभार मानण्यासाठी भाजप महिला मोर्चाने मुलुंड पूर्वेकडील मध्यवर्ती कार्यालयाबाहेर जल्लोष केला. भर पावसात महिलांनी फुगड्या घालून महिला आरक्षण विधेयक मंजूर केल्याबद्दल आनंद व्यक्त करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले. भाजपा महिला मोर्चाच्या सरचिटणीस रश्मी जाधव यांच्या नेतृत्वाखाली हा जल्लोष साजरा करण्यात आला.

# ओएलएक्स वर गिटार विकणे पडले महागात

## चार लाखांहून अधिक रुपयांची झाली फसवणूक

■ होम टाइम्स टीम

ओएलएक्सवर गिटार विकणे मुलुंडच्या रहिवाशाला खूप महागडे पडले आहे. गिटार खरेदीचे कारण सांगून क्यूआर कोड पाठवून अज्ञात व्यक्तीने मुलुंड येथील रहिवाशाची या कोडद्वारे चार लाखांहून अधिक रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणी नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या या प्रकरणाचा अधिक तपास नवघर पोलीस करत आहेत.

नवघर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी प्रतीक मोकाशी हे मुलुंड पूर्व येथील रहिवासी आहेत. ४ सप्टेंबर रोजी त्यांना ओएलएक्सपवर जुने गिटार ४,५०० रुपयांना विकण्यासाठी जाहिरात अपलोड केली होती. ती जाहिरात पाहून कार्तिक शर्मा नावाच्या व्यक्तीने त्यांच्याशी संपर्क साधला आणि गिटार घेण्यास उत्सुक असल्याचे सांगितले. यानंतर राहुलने प्रतीक यांच्या मोबाईल नंबरवर एक क्यूआर कोड पाठवला आणि हा कोड स्कॅन केल्यानंतर त्यांच्या खात्यात पैसे जमा होतील, असे सांगितले. मात्र, जेव्हा प्रतीकने हा कोड स्कॅन केला तेव्हा त्यांच्या खात्यातून ४९९८ रुपये डेबिट झाले. ही माहिती मिळाल्यानंतर प्रतीक यांनी राहुल यांच्याशी यासंदर्भात संपर्क साधला असता, राहुलने तक्रारदाराच्या खात्यातून चुकून पैसे डेबिट झाल्याचे सांगितले. काही वेळाने राहुलने प्रतिकला पुन्हा स्कॅनर पाठवून पुन्हा एकदा त्यांच्या खात्यातून पाच हजार रुपये कापले. प्रत्येक वेळी फसवणूक झालेले पैसे प्रतिकच्या खात्यात जमा करण्याच्या बहाण्याने त्यांची हजारो रुपयांची फसवणूक करण्यात आली. अखेर पैसे परत मिळत नसल्याचे पाहून त्यांनी नवघर पोलीस ठाण्यात जाऊन घटनेची माहिती दिली व चार लाखांहून अधिक रुपयांची फसवणूक झाल्याचे पोलिसांना सांगितले. नवघर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध भादंवि कलम ३४, ४२० अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# वर्गणीसाठी जबरदस्ती करणाऱ्या दोघांवर गुन्हा दाखल

## नवघर पोलिसांनी केली कारवाई

■ होम टाइम्स टीम

मुलुंड पूर्वेकडील एका नामांकित गणेशोत्सव मंडळाच्या कार्यकर्त्यांवर वर्गणीसाठी धमकावल्याप्रकरणी अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणांमध्ये एका फेरीवाला विक्रेत्याकडून मंडळाच्या कार्यकर्त्यांनी वर्गणी देण्यासाठी जबरदस्ती केली होती. त्यानंतर विक्रेत्याकडून मुलुंड नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुलुंडच्या नवघर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये असलेल्या एका नामांकित गणेशोत्सव मंडळाच्या कार्यकर्त्यांनी हा प्रकार केला आहे. ज्यामध्ये मुलुंड म्हाडा कॉलनी परिसरात सदर विक्रेता हा आपले नेहमीच्या कामामध्ये व्यस्त असताना परिसरातील एका मंडळाच्या कार्यकर्त्यांनी त्यांना मंडळाची वर्गणी का नाही दिली अशी विचारणा केली. सदर विक्रेत्याने या आधीच त्याच्या घरातून तसेच त्याच्या दुकानातून देखील वर्गणी दिली होती. परंतु राकेश जाधव आणि प्रतीक वाकचौरे या दोघांनी गणपतीची दोन हजार रुपये वर्गणी देण्यासाठी त्यांना संपर्क केला आणि वर्गणी दिली नाही म्हणून त्यांना फोनवरून धमकावले. त्यानंतर विक्रेत्याने नवघर पोलीस ठाण्यात दोघांच्या विरोधात तक्रार दिली. पोलिसांनी सुरुवातीला या दोघांच्या विरोधात अदखलपात्र गुन्हा दाखल केला आहे.

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाकडून गणेश मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यासाठी आणि या ठिकाणी देखावा साकारण्यासाठी जो खर्च लागतो तो विभागातील नागरिकांकडून वर्गणीच्या स्वरूपात गोळा केला जातो. परंतु मंडळाचे काही कार्यकर्ते अशा प्रकारे नागरिकांवर, दुकानदारांवर जबरदस्तीने वर्गणीची पावती लादून त्यांच्याकडून अवाजवी वर्गणी वसूल करतात. अशी प्रकरणे या आधी देखील घडली आहेत. त्यामुळे अशा गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांवर कारवाई होणे गरजेचे असल्याचे मत लोकांकडून व्यक्त होत आहे.

# आईने नवजात अर्भकाला १४व्या मजल्यावरून फेकून दिले

■ होम टाइम्स टीम

मुलुंड पश्चिम येथे एका आईने आपल्याच ३९ दिवसांच्या अभ्रकला (मुलीला) इमारतीच्या १४व्या मजल्यावरून फेकून दिल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. या घटनेने मुलुंड व इतर परिसरात खळबळ उडाली आहे. मुलुंड पोलिसांनी मृताच्या आईविरुद्ध भादंवि कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## आईविरोधात गुन्हा दाखल

मुलुंड पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मनाली पतीसोबत सुरत येथे राहते. वैयक्तिक कारणास्तव मनाली आपल्या ३९ दिवसांच्या नवजात अर्भकासह मुलुंड पश्चिम ढावर रोडवरील तिच्या आईच्या घरी राहण्यासाठी आली होती. डिसेंबर २०२२ मध्ये तिच्या वडिलांचे निधन झाले. त्यानंतर ती मानसिकदृष्ट्या अस्वस्थ झाली. रोज प्रमाणे बुधवारी रात्री ती आपल्या घरी झोपली होती. दुसऱ्या दिवशी म्हणजेच गुरुवारी या इमारतीच्या पहिल्या मजल्यावर राहणाऱ्या व्यक्तीने खिडकी उघडली असता योगेश बिल्डिंगमधील फोटो स्टुडिओच्या छतावर नवजात अर्भकाचा मृतदेह पडलेला दिसला. त्यानंतर १०० क्रमांकावर फोन करून पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलीस घटनास्थळी पोहोचल्यानंतर ३९ दिवसांच्या नवजात बाळाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला. मुलुंड पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्याने याबाबत माहिती देताना सांगितले की, असता, नवजात बाळाचे नाव हशवी असून ती मुलगी आहे. मृताची आई मनाली ही मूकबधिर आरोपी असून वडिलांच्या मृत्यूनंतर ती मानसिकदृष्ट्या अस्वस्थ होती. मुलुंड पोलिसांनी मनालीविरुद्ध भादंवि कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल केला असून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

# घर देण्याच्या नावाखाली मुलुंडमधील रहिवाशाची १० लाखांची फसवणूक

## घरावर कर्ज असतानाही केला होता व्यवहार

■ होम टाइम्स टीम

मुलुंड पूर्व येथे घर देण्याच्या नावाखाली एका व्यक्तीची १० लाख रुपयांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. फसवणूक झालेल्याने दिलेल्या माहितीच्या आधारे नवघर पोलीस सध्या या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

नवघर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ३१ वर्षीय चंदन बेलदार हा मुलुंड पूर्व येथील रहिवासी आहे. ते नवीन घराच्या शोधात होते. घराचा शोध सुरू असताना श्यामराज जी बेलदार नामक व्यक्तीने चंदन यांना संपर्क केला आणि ते ज्या इमारतीत राहतात त्याच इमारतीत घर विकायचे असल्याचे सांगितले. हे घर २२ लाख रुपयांना विकायचे असल्याची माहिती देखील दिली. घराची सर्व कागदपत्रे तपासल्यानंतर चंदन यांनी एक लाख रुपये रोख आणि एक लाख रुपयांचा धनादेश श्यामराज बेलदार यांना दिला. त्यानंतर २७ जानेवारी २०२३ रोजी चंदनने श्यामराज बेलदार यांना पुन्हा ८ लाख रुपये दिले. मात्र फेब्रुवारी २०२३ मध्ये ज्ञानदीप पतसंस्थेच्या अधिकाऱ्यांनी या घराला नोटीस देण्यास सुरुवात केली. याबाबत अधिक माहिती घेतल्यानंतर श्यामराज बेलदार कुटुंबीयांनी हे घर गहाण ठेवून १० लाख रुपयांचे कर्ज घेतल्याचे चंदनला समजले. ज्यावर ३ लाख रुपयांचे व्याजही झाले आहे. ही माहिती चंदन पासून लपवून ठेवण्यात आली होती. त्यामुळे कर्जाची माहिती समोर येताच चंदन यांनी श्यामराज यांच्याकडे पैसे परत करण्याची मागणी केली.दिलेले १० लाख रुपये परत करण्यास सांगितल्यावर बेलदार कुटुंबीयांनी चंदनच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करण्यास सुरुवात केली. अनेक महिने वाट पाहूनही चंदनला पैसे न मिळाल्याने अखेर त्याने थेट नवघर पोलीस ठाण्यात जाऊन घटनेची माहिती दिली. सध्या नवघर पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# टेलिग्रामवर टास्क देऊन लोकांची फसवणूक करणाऱ्या टोळीचा मुलुंड पोलिसांनी केला पर्दाफाश

■ होम टाइम्स टीम

घरबसल्या कामे करून चांगले पैसे कमावण्याचे आमिष देऊन बेरोजगारांची फसवणूक करणाऱ्या टोळीचा मुलुंड पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी या गुन्ह्यात एका नायजेरियन नागरिकासह पाच जणांना अटक केली असून त्यांच्याकडून अनेक मोबाईल फोन, लॅपटॉप आणि सिमकार्डही जप्त करण्यात आले आहेत. या प्रकरणात आणखी काही आरोपींचा सहभाग असू शकतो असा पोलिसांना संशय आहे.

टेलिग्रामवर टास्क पूर्ण करण्याच्या बदल्यात चांगले पैसे कमावण्याचे आमिष दाखवून बेरोजगार लोकांची फसवणूक होण्याच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. काही महिन्यांपूर्वी मुलुंड येथे राहणाऱ्या एका महिलेला अशाच प्रकारे बनावट संदेश पाठवून तिची लाखो रुपयांची फसवणूक केली होती. पोलिसांनी तपास करताना या प्रकरणाचा कसून शोध

## नायजेरियनसह ५ जणांना अटक



घेतला असता या टोळीचा शोध लागला. या रॅकेटमध्ये नायजेरियन आरोपीचाही समावेश आहे. मुलुंड पोलिसांनी बेंगळुरू येथून मोहम्मद कादर (३४) याला त्याच्या साथीदारांसह अटक केली. अजय पाठक (३४), इम्रान खान (४२), नालासोपारा येथून झाकीर अन्सारी (५२) आणि नायजेरियन सोपुलु सॅम्युअल (४३) यांचा समावेश आहे. मुलुंड पोलिसांनी आरोपींकडून १४ एटीएम कार्ड, १३ चेकबुक, ४ पासबुक, २० मोबाईल फोन, २ लॅपटॉप आणि ११ सिमकार्ड जप्त केले आहेत. या आरोपींना परिमंडळ ७ चे पो.उपायुक्त पुरुषोत्तम कराड यांच्या मार्गदर्शनाखाली व मुलुंड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पो.निरीक्षक कांतीलाल कोथिंबिरे यांच्या नेतृत्वाखाली पो.उपनिरीक्षक शिवानंद अपुणे व त्यांच्या पथकाने अटक केली आहे. या आरोपींची कसून चौकशी केली जात असून अशा प्रकारच्या गुन्ह्यात आणखी कोणाचा सहभाग आहे का याचा पोलिसांकडून शोध घेतला जात आहे. तर लोकांनी अशा कोणत्याही अमिषाला बळी पडू नये, असे व्यवहार करताना संपूर्ण खात्री करून घेण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

10 Helpline

सिटीजन रिपोर्टर
78956 78956

होम केबल
022 - 6614 6060

होम नेट
022 - 6621 1333
customerservice@homenet.net

होम टाइम्स
022 - 6614 6050
write2us@hometimes.in

होम टाइम्स आणि होम केबलवर जाहिरात द्या
78957 78957
homecableads@gmail.com

योग्य माहितीसाठी कृपया संबंधित नंबरांवरच संपर्क करा

## जाहिरातींबाबत महत्त्वाची सूचना

साप्ताहिक होम टाइम्समधून जाहिरातदारांच्या विविध प्रकारच्या जाहिराती प्रकाशित केल्या जातात. या जाहिरातीतील मजकुराबाबत सर्वस्वी जबाबदारी जाहिरातदारांची असून त्याबाबत उद्‌भवणाऱ्या कायदेशीर वा अन्य प्रकरणात साप्ताहिक होम टाइम्सचे व्यवस्थापन, मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक यांच्यासह कोणीही जबाबदार असणार नाही. याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

– मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक



आरोग्य आशा
डॉ. मोनिषा रावत

# 'सुजोक'

## हॉट फ्लॅशस-रजोनिवृत्तीची लक्षणे...

औषधांशिवाय नैसर्गिकरित्या उपचार आणि व्यवस्थापन-१

जेव्हा गरम चमक तीव्र असते तेव्हा ते तासातून चार किंवा पाच वेळा किंवा दिवसातून २०-३० वेळा येऊ शकतात - ओमिसेली

*हॉट फ्लॅश हे स्त्रीच्या जीवनातील रजोनिवृत्तीचे एक सामान्य लक्षण आहे. या टप्प्यात इस्ट्रोजेनची पातळी कमी झाल्यामुळे ही स्थिती उद्भवते. ८०% स्त्रिया सुमारे २ वर्षांपासून हॉट फ्लॅशने ग्रस्त आहेत. ही स्थिती त्यांच्या दैनंदिन जीवनाच्या गुणवत्तेवर परिणाम करू शकते. संशोधन अभ्यास दर्शविते की ज्या स्त्रियांना जास्त हॉट फ्लॅश चमक येते त्यांना हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग आणि हाडांचे नुकसान होण्याची शक्यता जास्त असते.*

**लक्षणे :-**

- *शरीराच्या वरच्या भागाच्या तापमानात अचानक वाढ, विशेषत: चेहरा, मान आणि छाती.*
- *चेहऱ्यावर लालसरपणा*
- *जलद हृदयाचा ठोका*
- *शरीराच्या वरच्या भागात घाम येणे*
- *उच्च चिंता*



*हॉट फ्लॅश १ ते ५ मिनिटांपर्यंत टिकू शकतात आणि त्यांची वारंवारता आणि तीव्रता महिलांमध्ये भिन्न असू शकते. ही समस्या रात्रीच्या वेळीही उद्भवू शकते. (रात्री घाम येणे), ज्यामुळे दीर्घकाळ झोपेचा त्रास होऊ शकतो.*

*आमच्या 'मोनिषाज मंत्रा' मध्ये आम्ही अनेक महिलांना त्यांच्या हॉट फ्लॅशपासून बचाव आणि उपचार करण्यासाठी खालील प्रकारे औषधोपचार न करता आणि कोणतेही दुष्परिणाम न करता मदत केली आहे.*

- *चालणे, स्ट्रेचिंग व्यायाम, योग-प्राणायाम या स्वरूपात शारीरिक हालचाली वाढवा.*
- *दररोज ३ वेळा १० मिनिटे उदरच्या श्वासोच्छवासाचा*




*(डायफ्रॅगनिक श्वासोच्छवासाचा) सराव करा.*

- *गरम आणि मसालेदार पदार्थ, कॅफिनयुक्त पेये, अल्कोहोल, निकोटीन यांसारखे ट्रिगर टाळणे.*

## सुजोक थेरपी




- *ॲक्युप्रेशर-* हाताच्या तळहातावर अंडाशय आणि गर्भाशयाशी संबंधित क्षेत्राला हलक्या दाबाने मालिश करणे, दररोज ३-४ वेळा एक मिनिट. (चित्र १ प्रमाणे)




- *बियाणे थेरपी -* दररोज रात्री हाताच्या कोणत्याही बोटाच्या बाहेरील खालच्या भागावर किडनीबीनच्या बिया चिकटवलेल्या टेपवर लावा. (चित्र २ प्रमाणे)

**आंतरराष्ट्रीय सुजोक असोसिएशन (ISA) प्रमाणित कार्यशाळेचे वेळापत्रक :**
१. ऑनलाइन-सुजोक Six Ki-1 (Level-III) १२ ते २३/१०/२०२३, २. निवासी, मेरिडियन सुजोक Ki (Level-II) २७ ते २९/१०/२०२३
•Limited Seats Registration on First Cum First Basis.

**Dr.Monisha Rawat - Founder of 'Monisha's Mantra', Mumbai and Global We Care Foundation -**
M.Sc., M.D. (Alternative Medicine), Life Coach, Master in Sujok, Consulting Nutritionist, Corporate Trainer, Holistic Counselor, Sujok Diabetes Specialist, International Lecturer for Sujok & Smile Taiji. ISA Authorized Lecturer for SUJOK Level - I, II, III & IV Award Winner as a BEST PERFORMING TEACHER by International Sujok Association (ISA) – SIC 2019 • National Excellence Health Award - 2019 During COVID-19 • Award winner of International Women Excellence Empowerment Award (WEE) – 2020 as a RISING STAR • Award winner of India Best Therapist Award for the Year 2021 by MKSS • Award Winner of ET CHANGE MAKER-2022 for Health & Wellness powered by Economic Times-Ascent & Navbharat Times
Award winner of PILLAR OF MAHARSHTRA AWARD-2022, in Association with MahaSEWA.
**An ISO Certified Centre at Mumbai Mulund- +91 8655139777/ 9029960086, Goregaon - +91 8433947592 / 9820343592**




सुनिता देसाई

# आरोग्य आणि मनोरंजन


## टॅरो कार्ड वाचन भविष्य आणि सल्ला

२३ सप्टेंबर २०२३ ते २९ सप्टेंबर २०२३


*सुनिता देसाई २००३ पासून टॅरो रिडींग करतात. ग्रँड मास्टर इन रेकी, फोर लेव्हल्स इन चक्रा मेडिटेशन, मास्टर्स इन मरमा, जीपी इन शियात्सू, क्रिस्टल ॲन्ड पिरॅमिड एक्स्पर्टस, मास्टर्स इन ॲक्युप्रेशरीस्ट, अरोमा थेरपिस्ट, प्रानीक हिलर, औरा हिलर आणि व्हर्च्यू पर्सनॅलिटी डेव्हलपमेंटवर दोन पुस्तके लिहिली आहेत. जे गुजराती माध्यमिक शाळेत शिकवले जाते.*
*संपर्क : ९३२३४३०३५५ e-mail : desaisunita02@gmail.com*




■ **मेष** (अ, ल, इ)
तुमच्या भावना वेळोवेळी बदलतील आणि आजूबाजूच्या लोकांच्या काही तक्रारी असतील. **सल्ला :** ध्यान आणि पवित्र स्थळाला भेट दिल्याने तुम्हाला मदत होईल. केशरी रंग वापरा आणि आकाशी निळा रंग टाळा. तुमच्या आत्मविश्वासाकडे लक्ष द्या.





■ **कर्क** (ड, च, ह)
तुम्हाला काही चांगले पैसे मिळतील आणि ते योग्यरित्या वापरले जातील. **सल्ला:** दयाळू आणि अधिक उदार होण्याचा प्रयत्न करा. हिरवा रंग वापरा आणि मिठाई टाळा. तुमच्या विश्वासाकडे लक्ष द्या.





■ **तुळ** (र, ट)
तुम्ही तुमच्या चुका आणि अनेक बाबींमध्ये होणारा विलंब सुधारण्यास सक्षम असाल. **सल्ला:** तुमच्या कल्पना आणि रागावर नियंत्रण ठेवा. तुम्ही काही करता किंवा बोलता तेव्हा परिणामांची कल्पना करा तुमच्या विचारांकडे लक्ष द्या.





■ **मकर** (ख, ज)
तुम्ही स्वत:ला अनेक बाबतीत सामर्थ्यवान समजाल आणि लोक तुम्हाला साथ देतील. **सल्ला:** तुमचे जुने कपडे गरजू लोकांना दान करा. गुलाबी रंगाच्या वस्तू वापरा. तुमच्या लक्ष्याकडे लक्ष द्या.




■ **वृषभ** (ब, व, य)
तुम्ही काहीतरी नवीन शिकाल जे तुम्हाला अनेक प्रकारे मदत करेल. तुमची आर्थिक स्थिती ठीक आहे. **सल्ला:** काही वापरलेल्या वस्तू गरजूना दान करा. लाल रंग वापरा आणि हिरव्या गोष्टी खा. तुमच्या लोभाकडे लक्ष द्या.




■ **सिंह** (म, ट)
तुम्हाला दिसेल की अनेक गोष्टी सुरळीत चालू आहेत आणि तुम्हाला मन:शांती मिळेल. **सल्ला:** नकारात्मक आणि उद्धटपणे प्रतिक्रिया देऊ नका. इतर लोक आणि त्यांचे सल्ले ऐका. तुमच्या निर्णयांकडे लक्ष द्या.




■ **वृश्चिक** (न, य)
तुम्ही या आठवड्यात आनंद घ्याल आणि बरेच लोक तुम्ही केलेल्या कामाची प्रशंसा करतील. **सल्ला:** तुमच्या भावना आणि नातेसंबंधांवर नियंत्रण ठेवा. कोणतेही काम अर्धवट सोडू नका. तुमच्या रागाकडे लक्ष द्या.




■ **कुंभ** (ग, स, श)
तुम्ही बऱ्याच वेळा गोंधळात पडाल. यश आहे पण काही अतिरिक्त दबावासह. **सल्ला:** काही नवीन करण्यापूर्वी दोनदा विचार करा. लाल रंगाच्या गोष्टी वापरा. तुमच्या प्रेमाकडे आणि काळजीकडे लक्ष द्या.





■ **मिथुन** (क, च, ज)
तुम्हाला तुमच्या परिस्थिती किंवा समस्यांवर विजय मिळेल आणि शांतता मार्गावर आहे. **सल्ला:** तुमचा विश्वास असलेल्या व्यक्तीची मदत घ्या. पिवळा रंग आणि सोन्याचे दागिने वापरा. तुमच्या निर्णयांकडे लक्ष द्या.




■ **कन्या** (प, ठ, ण)
भूतकाळातील तुमच्या चुकांमुळे तुम्हाला काही समस्यांना सामोरे जावे लागेल. तुमचे धैर्य तुम्हाला मदत करेल. **सल्ला:** स्वार्थी लोकांच्या मागे धावू नका. अंतर ठेवा.गुलाबी वस्तू वापरा आणि फळे खा. तुमच्या भुकेकडे लक्ष द्या.




■ **धनु** (भ, ड, फ, ट)
या आठवड्यात पैशात काही सुधारणा होईल आणि तुमचा दृष्टीकोन तुम्हाला मदत करेल. **सल्ला:** जेव्हा तुमच्या भावना नकारात्मक असतात तेव्हा त्यावर नियंत्रण ठेवा. वस्तू पिवळ्या रंगात वापरा. तुमच्या कामाकडे लक्ष द्या.




■ **मीन** (द, च, झ)
मन:शांती आणि समाधान मिळविण्यासाठी तुम्हाला काही चांगले मार्ग सापडतील. **सल्ला:** वाद टाळा आणि लोकांची मते जाणून घेण्याचा प्रयत्न करा. गडद निळ्या रंगाच्या गोष्टी वापरा. तुमच्या विश्वासाकडे लक्ष द्या.

# पोलिसांकडून गुंडांवर 'वॉच'

## रेकॉर्डवरील गुन्हेगारांना पोलिसांकडून ताब्यात घेण्याची मोहीम सुरू

■ **होम टाइम्स टीम**

**गणेशोत्सवाच्या दिवसांमध्ये कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पोलिसांनी कंबर कसली आहे. अशी परिस्थिती निर्माण करणाऱ्या समाजकंटकांच्या विरोधात मुलुंड पोलिसांकडून कारवाई सुरू करण्यात आली आहे. गणेशोत्सवात होणाऱ्या अशा घटनांना आळा घालण्यासाठी मुलुंड पोलिसांनी गुंडांवर नजर ठेवायला सुरुवात केली आहे. खबरदारी म्हणून काही जणांना ताब्यात देखील घेण्यात येते. त्यासाठी तर काहींना नोटीसा देण्यात आल्या आहेत.**

मुंबईमध्ये सध्या सर्वत्र गणेशोत्सवाची धूम आहे. अशा परिस्थितीमध्ये अनेकदा गणेशोत्सवानिमित्त बाहेरगावी गेलेल्या नागरिकांच्या बंद घरांमध्ये घुसून घरफोड्या करणे तसेच गर्दीचा फायदा घेत चोऱ्या करणे, किरकोळ कारणांवरून मारामाऱ्या करणे असे विविध प्रकार घडत असतात. मात्र असे गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांवर पोलिसांनी नजर ठेवली आहे.

पोलीस रेकॉर्डवर असलेल्या गुन्हेगारांवर पोलीस पाळत ठेऊन आहेत. ज्या आरोपींच्या नावावर दोन किंवा त्यापेक्षा जास्त गुन्हे दाखल आहेत, अशांना पोलिसांनी त्यांच्या रेकॉर्डवर घेतले आहे. अशा आरोपींच्या रहिवासी पत्त्यावर जाऊन त्यांना या पोलीस ठाण्यात बोलविले जाते आणि त्यांच्यावर नजर ठेवली जाते. सोबतच जे गुन्हेगार हे अलीकडे कुठल्याही गुन्ह्यांमध्ये सहभागी नाहीत अशा गुन्हेगारांवर देखील नजर ठेवण्यात येत आहे. गुन्हेगारांना गुन्ह्याच्या स्वरूपाप्रमाणे नोटीस दिली जाते. तर काहींना थेट गणेशोत्सव काळापर्यंत पोलीस ठाण्यातच ठेवले जाते. टोळी युद्ध, घरफोड्या, मारामारी अशा प्रकारचे गुन्हे ज्या व्यक्तींच्या नावावर आहेत आणि ज्या व्यक्ती मुलुंड परिसरात राहणाऱ्या आहेत अशा व्यक्तींवरच विशेष नजर ठेवली जात आहे. मुलुंड पूर्वेकडे अनेकांवर अशी कारवाई करण्यात आली आहे. तर मुलुंड पश्चिमेकडेही काही जणांवर अशा प्रकारे कारवाई करण्यात आली आहे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न या उत्सव काळामध्ये कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहावी, भाविकांचा गणेशोत्सव सुरक्षित व्हावा यासाठी पोलीस प्रशासनाने उचललेले हे पाऊल परिणामकारक ठरत आहे.

# घर फोडून दोन लाखाहून अधिक रुपयाचे सोन्याचे दागिने नेले चोरून

■ **होम टाइम्स टीम**


घर फोडून दोन लाखांहून अधिक रुपयांचे सोन्याचे दागिने चोरून चोर पसार झाल्याची घटना मुलुंड पूर्व येथे उघडकीस आली आहे. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर नवघर पोलीस तांत्रिक तपासाच्या मदतीने आरोपीचा शोध घेत आहेत.


नवघर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, भास्कर शिकवलकर हे नवघर रोड येथील रहिवासी आहेत. ते १५ सप्टेंबर रोजी सायंकाळी कामानिमित्त पत्नीसह बाजारात गेक होते. काही वेळाने त्यांचा मुलगा घरी परतला असता दरवाजाचे कुलूप तुटलेले दिसले. याबाबत मुलाने तात्काळ वडिलांना ही माहिती दिली. ते घरी परतल्यावर त्यांना घराच्या तिजोरीचा दरवाजाही उघडा असल्याचे व आत ठेवलेले सोन्याचे दागिने गायब असल्याचे दिसले. ज्यामध्ये ९० हजार रुपये किमतीचे ३० ग्रॅम सोन्याचे मंगळसूत्र, १५ हजार रुपये किमतीचे ५ ग्रॅमचे कानातले, ३० हजार रुपये किमतीचे १० ग्रॅम सोन्याचे नेकलेस, ३० हजार रुपये किमतीची ५ ग्रॅमची अंगठी - यासोबतच ३ ग्रॅम किमतीच्या दोन सोन्याच्या अंगठ्या, एक सोन्याचे दागिने. ५ ग्रॅमची चेन, १२ हजार रुपये किमतीचे ४ ग्रॅमचे सोन्याचे ब्रेसलेट, ५ हजार रुपये रोख आणि दोन टायटन घड्याळे इत्यादी साहित्य गायब होते. ज्याची एकूण किंमत २ लाख २६ हजार रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर भास्कर यांनी नवघर पोलिस ठाणे गाठून घटनेची माहिती दिली. सध्या नवघर पोलिसांनी अज्ञात व्यक्तिविरुद्ध भादंवि कलम ३८० अन्वये गुन्हा दाखल केला असून आरोपीचा कसून शोध सुरू आहे.

# मुलुंड पूर्व येथील गोदामातून लाखो रुपयांचा माल चोरणाऱ्या तीन आरोपींना अटक

■ **होम टाइम्स टीम**

**मुलुंड पूर्व येथील गोदामातून लाखो रुपयांचा माल चोरणाऱ्या तीन आरोपींना नवघर पोलिसांनी गेल्या आठवड्यात अटक केली आहे. या आरोपींकडून चोरीचा मालही जप्त करण्यात आला आहे. सध्या तिन्ही आरोपी कोठडीत आहेत.**





११ सप्टेंबर रोजी मुलुंड पूर्व येथील एका गोदामातून बांधकामात वापरल्या जाणाऱ्या लाखो रुपयांच्या वस्तूंची चोरी झाल्याचा गुन्हा नवघर पोलीस ठाण्यात दाखल झाला होता. त्यानंतर नवघर पोलिसांनी हे प्रकरण गांभीर्याने घेत आरोपींचा शोध सुरू केला. ६० हून अधिक सीसीटीव्ही कॅमेरे स्कॅन करून तीन आरोपींना नवघर पोलिसांनी अटक केली. २५ वर्षीय समीर, २६ वर्षीय विकास परिदा आणि ३३ वर्षीय दिनेश स्वाईन अशी या तीन आरोपींची नावे आहेत.

## चोरीचा मुद्देमालही केला जप्त

या आरोपींकडून चोरीचा मालही जप्त करण्यात आला आहे. तिघेही मूळचे ओडिशाचे रहिवासी आहेत. परिमंडळ ७ चे पोलीस उपायुक्त पुरुषोत्तम कराड यांच्या मार्गदर्शनाखाली व नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्ताराम गिरप यांच्या नेतृत्वाखाली पोलीस निरीक्षक जयवंत संकपाळ, पोलीस निरीक्षक संतोष धाडवे, पोलीस निरीक्षक शिवकुमार वाकचोरे, पोलीस हवालदार सुरेश पाटील, पोलीस हवालदार संतोष गुट्टे यांनी ही कारवाई केली. पोलीस कॉन्स्टेबल मंगेश दंडगावहड, महिला पोलीस कॉन्स्टेबल अश्विनी काळे यांनी आरोपींना अटक करण्या कामी सहभाग घेतला.

CALL CENTER
022 66211333

E-MAIL ID
customerservice@homenet.net

FACEBOOK MESSENGER
HomeNet / @homenet.net

**Facebook Messenger Scan Code**:
To get in touch, simply scan
a code using the Messenger app.

HOME NET
www.homenet.net

WOW!
DOUBLE MAZZA!!
uploads & downloads
at same speed, since 2010
now @ ₹194/-*

Pay For 6 Months & Get Additional 7 Months Free

67 PE OFFER

## TRULY UNLIMITED SPEED PLANS

| PLAN NAME | 30 DAYS RATE | | 390 DAYS |
|---|---|---|---|
| 20 Mbps Unlimited | 500/- | NOW 231/-* | 3000/- |
| 30 Mbps Unlimited | 600/- | NOW 276/-* | 3600/- |
| 40 Mbps Unlimited | 720/- | NOW 332/-* | 4320/- |
| 50 Mbps Unlimited | 850/- | NOW 392/-* | 5100/- |
| 60 Mbps Unlimited | 985/- | NOW 455/-* | 5910/- |

## UNLIMITED POWER PLANS

| PLAN NAME | DATA(GB) | SPEED AFTER DC | 30 DAYS RATE | | 390 DAYS |
|---|---|---|---|---|---|
| 40 Mbps till Allotted Data | 250 | 20 Mbps | 600/- | NOW 277/-* | 3600/- |
| 60 Mbps till Allotted Data | 500 | 30 Mbps | 750/- | NOW 346/-* | 4500/- |

UPLOAD OR DOWNLOAD @SAME SPEED
99% UPTIME

- Affordable Rates
- Super speed Upto 100 mbps
- Customer support Android / IOS app
- Online Payments
- Customer care 9 am - 12 midnight

## NEWLY LAUNCHED - FIBER TO THE HOME TECHNOLOGY

HOME FIBER
powered by HomeNet

UNLOCK YOUR SUPERPOWER

## INTRODUCTORY HOME FIBER PACKS

UPGRADE YOUR EXISTING HOME NET TO
NEW FIBERNET EXPERIENCE WITH
ZERO INSTALLATION COST **
For New Customers installation charges of Rs.500/-* applicable

### HOME FIBER TRULY UNLIMITED SPEED PACKS

| PACK NAME | DATA(GB) | SPEED AFTER DC | EFFECTIVE MONTHLY RATE | 360 DAYS |
|---|---|---|---|---|
| 35 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 337/-* | 4040/- |
| 50 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 421/-* | 5050/- |
| 75 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 505/-* | 6060/- |
| 100 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 589/-* | 7070/- |

Many more Speed Pack options available up to 500 Mbps
** offer available only at the FTTH G / EPON Ready Building

TO AVAIL THIS
INTRODUCTORY OFFER
IN YOUR SOCIETY
PLEASE COME TO US WITH
A MINIMUM GROUP OF
15 CONNECTIONS

SYMMETRIC SPEED
SUPER SPEED PACK UP TO 500MBPS
EASY LOCAL APPROACH FOR ISSUE RESOLUTION
FASTER VISITS FOR TECHNICAL SOLUTIONS
NO VISIT CHARGES FOR ISSUES & COMPLAINTS

Customer Portal **login.homenet.net**
Customer Service Mobile App **Log2Space - HomeNet**
Download on the App Store | GET IT ON Google Play

FOR NEW CONNECTIONS OR QUERIES CALL
**Call - 75067 96562, 88790 00724, 88790 00720, 88794 47839**
**MULUND** - A / 16, Gaurav Annex, R.R.T Road, Mulund (W), Mumbai - 400 080. Tel.: 022 662 11 333

MALAD • COLABA • VASHI • NERUL • THANE • AIROLI • ASANGAON • VASIND

*conditions apply

Printer , Publisher & Owner : **Hemanshu Girish Kothari** & Printed at Dangat Media Pvt. Ltd, Plot No.22, Digha MIDC, Vishnu Nagar, TTC Industrial Area, Digha, Navi Mumbai. Published at G/4, Landmark Appartment, Devidayal Cross Road, Mulund (W), Mumbai - 80.**Home Times** (Office): - 6th Floor, Flora Point, S.N. Road, Near Mulund Court, Mulund (W), Mumbai-80. **Editor : Hemanshu Girish Kothari** ● **RNI No.: MAHMAR/2016/66872**